मोटार वाहन विभागातील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील निर्माण करण्यात आलेल्या १३ अधिसंख्य पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.२००/परि-४,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५ मे २०१८

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टिआरएन २०१३/प्र.क्र.८४/१३/१२अ, दिनांक २०.०१.२०१४

२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१६/प्र.क्र.३३/१६/१८ब, दिनांक १६.०४.२०१६

३) समक्रमांकाचे दि. २५.०५.२०१६ रोजीचा शासन निर्णय.

४) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-०४१८/प्र.क्र.३१/सीपीटीपी-बी, दि. २७.०४.२०१८.

प्रस्तावना:-

राज्य सेवा मुख्य परिक्षा-२०१५ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या मोटार वाहन विभागातील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-३ करीता १३ अधिसंख्य पदे दि. ०२.०५.२०१६ पासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात आली होती. सदर अधिसंख्य पदांची मुदत दि. ०१.०५.२०१८ रोजी संपली आहे. तसेच उक्त १३ अधिसंख्य पदांना दि. ३१.०५.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये सूचित केले आहे. यास्तव सदर अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

राज्य सेवा मुख्य परिक्षा-२०१५ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या मोटार वाहन विभागातील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-३ करीता संदर्भ क्र. ३ वरील दि. २५.०५.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये १३ अधिसंख्य पदे दि. ०२.०५.२०१६ पासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात आली होती. सदर अधिसंख्य पदांची मुदत दि. ०१.०५.२०१८ रोजी संपली आहे. आता उक्त सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील १३ अधिसंख्य पदांना दि. ०२.०५.२०१८ ते दि. ३१.०५.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच उक्त

परिविक्षाधीन अधिकारी सध्या खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी जेथे कार्यरत आहेत तेथेच त्यांना दि. ३१.०५.२०१८ रोजीपर्यंत कार्यरत ठेवण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०५१५१७४४६९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.05.05 15:21:48 +05'30'

(द.ह. कदम)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
२. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनि, पुणे.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. वरिष्ठ प्रशासन व लेखा अधिकारी, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, नागपूर.
७. उप सचिव (सीपीटीपी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती- परिवहन-४.